## नियमित दिवाणी दावा क्र.४५/२०१४ मधील निशाणी १०६ वरील आदेश

१. वादी यांनी हा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ६, नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांनी या अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे.

३. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

४. वादी यांच्या अर्जातील कथनांप्रमाणे प्रतिवादी क्र.१ हे मयत झाल्यानंतर त्यांनी त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेबाबत अर्ज दिला होता. त्यानुसार त्यांनी प्रतिवादी क्र.१ चे वारस प्रतिवादी क्र.१/१ ते १/६ यांना या कामी अभिलेखावर घेतले आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.१/१ अंतिकाबाई भ्र. शंकर डोंगरे ह्या दिनांक १२.०२.२०२३ रोजी मयत झाल्या असून त्यांचे वारस प्रतिवादी क्र.१/२ ते १/६ अभिलेखावर आहेत. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१/१ यांचे नावासमोर कंसामध्ये ''मयत'' अशी नोंद करणेसाठी वादी यांनी या अर्जान्वये दावा दुरूस्तीची मागणी केली आहे. प्रतिवादी यांनी अर्जास हरकत घेतली आहे. परंतु, वादी यांनी अर्जाचे पुष्टयर्थ शपथपत्र सादर करुन अर्जातील कथने शपथेवर कथन केली आहेत. अभिलेखातील निशाणी १०५ वरील मृत्यू प्रमाणपत्र पाहता प्रतिवादी क्र.१/१ अंतिकाबाई शंकर डोंगरे ह्या दिनांक १२.०२.२०२३ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. मयत प्रतिवादी क्र.१/१ यांचे वारस दाव्यात पूर्वीपासून समाविष्ट आहेत. वादी यांनी मागणी केलेली दावा दुरुस्ती ही तांत्रिक व औपचारिक स्वरुपाची आहे. त्यामुळे, वादी यांना त्यांच्या अर्जात मागणी केल्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी देणे न्यायाच्या दृष्टीने योग्य व उचित होईल. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहेः–

## आदेश

१. वादी यांचा हा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादी यांनी अर्जात मागणी केलेप्रमाणे त्यांना दाव्यामध्ये दुरुस्ती करणेसाठी

परवानगी देणेत येत आहे.

३. वादी यांनी आजपासून चौदा (१४) दिवसांच्या आत दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्ती करणेची आहे.

–

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2023.04.11 14:52:35 +0530

दिनांक : ११.०४.२०२३ (डी.एम.हिंग्लजकर)

ठिकाण : वडवणी दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, वडवणी,
ता.वडवणी, जि.बीड.

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/order.

Sd/-
(Amol D. Mule)
Stenographer (Grade-3)
Civil Court Junior Division
Wadwani

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 11.04.2023 |
| Transcribed on | : | 11.04.2023 |
| Checked and signed on | : | 11.04.2023 |